## प्रेसनोट दि. ०५/१०/२०१८

## सिंहगड पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील फ्लॅटवर छापा
## ३ सज्ञान मुलींची वेश्या व्यवसायतुन सुटका
## वेश्या व्यवसाय चालविणा-या २ महिलांना अटक

दि. ०४/१०/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग व अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कक्ष गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक मनिषा झेंडे, यांना पोलीस हवालदार नितीन तरटे यांचे कडुन माहीती मिळाली की, सिध्दी पॅलेस सोसायटी, फ्लॅट नंबर २९, न-हे ता. हवेली जि पुणे येथे महिला नामे अनिता भातुसे व वंदना आढाव या वेश्या व्यवसाय चालवत असले बाबत खात्रीशीर माहिती मिळाली, त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनिषा झेंडे व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच सिंहगड पोलीस स्टेशनकडील अधिकारी व कर्मचारी यांनी संयुक्त कारवाई करुन सिंहगड पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील सिध्दी पॅलेस सोसायटी, फ्लॅट नंबर २९, न-हे ता. हवेली जि पुणे येथे चालत असलेल्या वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान एकुण ३ सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणा-या दोन महिला आरोपीना यांचे विरुध्द सिंहगड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ४७९/१८ इटपा ॲक्ट १९५६ चे क. ३,४,५ सह भादंवि कलम ३७०,३७० अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वेश्या व्यवसाय चालविणा १. अनिता चंद्रकांत भातुसे वय ५१ वर्ष रा. फलॅट नंबर २९, तळमजला, ए बिल्डींग, स नं १/१/२/१ सिध्दी पॅलेस न-हे पुणे ४१, २. वंदना रमेश आढाव वय ४० वर्षे रा. देवश्री कॉंपलेक्स, मानाजी नगर, न-हे पुणे, यांना कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. २०००/- रुपये, दोन मोबाईल फोन, व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलीना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, पोउनि आनंत व्यवहारे, पोउनि योगिता कुदळे, कर्मचारी नामदेव शेलार, नितीन तरटे, राजाराम घोगरे, राजेद्र कचरे, सुनिल नाईक, पालवे, ननिता येळे, सुप्रिया शेवाळे, रुपाली चांदगुडे यांनी व सिंहगड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सरदार पाटील, व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.